NMC/audit/2024/162

नाशिक महानगरपालिका,नाशिक
मुख्यलेखापरिक्षक यांचे कार्यालय,
जा.क्र./मुलेप/कार्या-६/३२९/२०२४
दिनांक : ६/ ९ /२०२४

**प्रति,**
**मा.आयुक्त तथा प्रशासक सो.,**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक.**

**विषय** :- मुख्य वित्त व लेखा विभागाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेख्यांचा लेखापरिक्षण अहवाल..

**संदर्भ** :- १) महाराष्ट्र शासन नगरविकास परिपत्रक के.लोलेस/२०१६/प्र.क्र.०३/नवि-३१ दि.२२/०१/२०१६.
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/०६/१४/२०२४ दि.०१/०४/२०२४
३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/०९/१९/२०२४ दि.०३/०४/२०२४
४) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/२६/२०२४ दि.०८/०४/२०२४
५) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/कार्या ०४/२१/२०२४ दि.१८/०४/२०२४
६) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/ २४८/२०२४ दि.२०/०४/२०२४
८) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/४२/२०२४ दि.२५/०४/२०२४
९) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/कार्या ०४/४५/२०२४ दि.२९/०४/२०२४
१०) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/कार्या ०४/४७/२०२४ दि.२९/०४/२०२४
११) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/५०/२०२४ दि.०२/०५/२०२४
१२) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/५१/२०२४ दि.०६/०५/२०२४
१३) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/६०/२०२४ दि.१३/०५/२०२४
१४) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/७४ /२०२४ दि.२८/०५/२०२४
१५) आपले पत्र क्र. मनपा/लेखा दि.२९/०५/२०२४
१६) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/९०/२०२४ दि.०५/०६/२०२४
१७) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/ ९१/२०२४ दि.०५/०६/२०२४
१८) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/ दि.१०/०६/२०२४
१९) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/ ८०/२०२४ दि.१८/०६/२०२४
२०) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/१२५/२०२४ दि.२०/०६/२०२४
२१) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/१३१/२०२४ दि.२४/०६/२०२४
२२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/१३/२०२४ दि.२५/०६/२०२४.
२३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/कार्या ०५/१३४/२०२४ दि.२५/०६/२०२४
२४) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/१२७/२०२४ दि.२८/०६/२०२४
२५) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/ १२८/२०२४ दि.२८/०६/२०२४
२६) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/१३०/२०२४ दि.२८/०६/२०२४
२७) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/१२९/२०२४ दि.२८/०६/२०२४
२८) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/१५४/२०२४ दि.०१/०७/२०२४

२९) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/१३९/२०२४ दि.०३/०७/२०२४

३०) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/१३८/२०२४ दि.०३/०७/२०२४

३१) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ १७०/२०२४ दि.०८/०७/२०२४

३२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ १७६/२०२४ दि.१०/०७/२०२४

३३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/२०८/२०२४ दि.२४/०७/२०२४

३४) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २१४/२०२४ दि.२६/०७/२०२४

३५) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २८१/२०२४ दि.२९/०७/२०२४

३६) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/कार्या ०४/२१९/२०२४ दि.३०/०७/२०२४

३७) आपले पत्र क्र. मनपा/लेखा/ २०७/२०२४ दि.३०/०७/२०२४

३८) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २२१/२०२४ दि.३१/०७/२०२४

३९) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २२२/२०२४ दि.३१/०७/२०२४

४०) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २२४/२०२४ दि.३१/०७/२०२४

४१) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २३९/२०२४ दि.०८/०८/२०२४

४२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २४०/२०२४ दि.०८/०८/२०२४

४३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २५५/२०२४ दि.१९/०८/२०२४

४४) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २५६/२०२४ दि.१९/०८/२०२४

४५) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २५७/२०२४ दि.१९/०८/२०२४

४६) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २५८/२०२४ दि.१९/०८/२०२४

४७) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २५९/२०२४ दि.१९/०८/२०२४

४८) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २६०/२०२४ दि.१९/०८/२०२४

४९) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/वशि/ २८६/२०२४ दि.३०/०८/२०२४

सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे (जमा-खर्च) संदर्भातील अभिलेखे तपासणीकामी वित्त व लेखा विभागाने लेखापरिक्षण विभागास सादर केले होते. त्यानुसार वित्त व लेखा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या लेख्यांच्या आधारे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक लेख्यांची तपासणी करण्यात आली असता संबंधित कर्मचारी यांचेकडून आक्षेपित रक्कम रु. ५४,२००/- वसुल करण्यात आलेली आहे. तथापी खालील प्रमाणे आक्षेप आढळुन आले आहेत.

**परिच्छेद क्र. १ :- सन २०२३-२४ च्या मनपाच्या मंजुर अंदाजपत्रकाची पडताळणी केली असता पुढील प्रमाणे परिस्थिती आढळुन येत आहे.**

**<u>१) सन २०२३-२४ जमा-खर्चाची संक्षिप्त आकडेवारी तपशिल पुढील प्रमाणे आहे :-</u>**

(रु. लाखात)

| अंदाजपत्रक | मा. आयुक्तांनी शिफारस केलेले अंदाज | मा. स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाज | मा. महासभेचे मुळ अंदाजपत्रक | सुधारीत अंदाजपत्रक | प्रत्यक्ष जमा व खर्च |
|---|---|---|---|---|---|
| अ) जमा | | | | | |
| **प्रारंभिची शिल्लक** | ५१२६.१० | ५१२६.१० | ५१२६.१० | २९८३३.११ | २९८३३.११ |
| **अंदाजपत्रक अ** | २०१८६२.५० | २०१८६२.५० | २०१८६२.५० | १७९२५५.५० | १८०५३१.४९ |
| **अंदाजपत्रक क** | १२७७०.०० | १२७७०.०० | १२७७०.०० | ९८२४.५० | ९५५२.८९ |
| **अंदाजपत्रक प** | ३३३.०० | ३३३.०० | ३३३.०० | ३०४.९० | २४७.२० |
| **एकूण** | २१४९६५.५० | २१४९६५.५० | २१४९६५.५० | १८९३८४.९० | १९०३३१.५८ |
| **अग्रीम जमा** | २७६१५.५० | २७६१५.५० | २७६१५.५० | १८८१०.५० | १६३१४.९२ |

| अंदाजपत्रक | मा. आयुक्तांनी शिफारस केलेले अंदाज | मा. स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाज | मा. महासभेचे मुळ अंदाजपत्रक | सुधारीत अंदाजपत्रक | प्रत्यक्ष जमा व खर्च |
|---|---|---|---|---|---|
| एकूण एकंदर जमा | २४२५८१.०० | २४२५८१.०० | २४२५८१.०० | २०८१९५.४० | २०६६४६.५० |
| प्रारंभिक शिल्लकेसह एकूण जमा | २४७७०७.१० | २४७७०७.१० | २४७७०७.१० | २३८०२८.५१ | २३६४७९.६१ |
| ब) खर्च (महसुली) अ, क, प | १६८७५४.५० | १६८७५४.५० | १६८७५४.५० | १५९७५६.०० | १५१२०५.०८ |
| भांडवली खर्च अ,क,प | ७०११२.५० | ७०११२.५० | ७०११२.५० | ६१६५६.०० | ४३२१५.१८ |
| अग्रीम खर्च | ८७१९.०० | ८७१९.०० | ८७१९.०० | १०५१३.५० | ९१३३.३२ |
| एकूण एकंदर खर्च | २४७५८६.०० | २४७५८६.०० | २४७५८६.०० | २३१९२५.५० | २०३५५३.५८ |
| अखेर शिल्लक | १२१.१० | १२१.१० | १२१.१० | ६१०३.०० | ३२९२६.०२ |
| एकूण एकंदर | २४७७०७.१० | २४७७०७.१० | २४७७०७.१० | २३८०२८.५० | २३६४७९.६० |

सन २०२३-२४ या वर्षीच्या अंदाजपत्रकात जमा रक्कमेचे अंदाज प्रारंभिक शिल्लकेसह एकूण अंदाज र. रु. २४७७०७.१० लक्ष धरले परंतु प्रत्यक्षात मात्र र. रु. २३६४७९.६१ लक्ष जमा झाले म्हणजेच जमा मुळ अंदाजापेक्षा (प्रारंभिक शिल्लक वगळुन र. रु. ३५९३४.५० लक्ष इतकी कमी रक्कम जमा झालेली आहे. वित्तीय वर्ष सन २०२२-२३ च्या प्रत्यक्ष जमा रक्कमेच्या अनुषंगाने अर्थसंकल्पात सरासरी वाढ दर्शविणे आवश्यक असतांना अवास्तव अंदाज दर्शविण्यात आलेत. त्यामुळे मनपाचे खर्चाचे वास्तववादी नियोजन करण्यास अडचणी येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## २) मागील तीन वर्षाची अर्थसंकल्पीय तरतुदीची संक्षिप्त आकडेवारी.

मागील तीन वर्षातील मंजुर अंदाजपत्रकानुसार मा.आयुक्त, मा. स्थायी समिती, मा. महासभा यांचे अंदाज तसेच प्रत्यक्ष जमा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(रू. कोटीमध्ये)

| वर्ष | मा. आयुक्त | मा.स्थायी समिती | मा. महासभा | प्रत्यक्षजमा | प्रत्यक्षखर्च |
|---|---|---|---|---|---|
| २०२०-२१ | २१६१.७९ | २३९०.३४ | २९४२.१८ | २२६५.१४ | १७२५.५१ |
| २०२१-२२ | २३६१.५६ | २७६३.८१ | २८८८.८१ | २४२९.०१ | २१३४.४८ |
| २०२२-२३ | २२२७.०५ | २५६७.०२ | २२२७.०५ | २३४९.१४ | २०५०.८१ |
| **एकूण** | **६७५०.४०** | **७७२१.१७** | **८०५८.०४** | **७०४३.२९** | **५९१०.८०** |
| **सरासरी** | **२२५०.१३** | **२५७३.७२** | **२६८६.०१** | **२३४७.७६** | **१९७०.२६** |

उपरोक्त विवरण पत्रावरून व अर्थकल्पीय विवरणा वरून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

मनपाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारीक पध्दतीने घेतलेले आहेत. अर्थसंकल्प वास्तववादी होण्यासाठी मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रकमा, थकबाकी रक्कम या गृहीत धरणे आवश्यक आहे व त्यावर आधारीत चालु अर्थसंकल्पात जमा गृहीत धरली पाहिजे. परंतु उपरोक्त तक्त्यावरुन दिसुन येते की, मागील ३ वर्षातील प्रत्यक्ष जमा रकम खुप कमी आहेत. त्या तुलनेत मागील तीन वर्षाची जमेची सरासरी २३४७.७६ कोटी असतांना सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात मुळ अंदाजपत्रकानुसार र. रु. २४७७.०७ कोटी एवढी रक्कम अंदाजीत केलेली होती. तथापी प्रत्यक्ष प्रारंभिक शिल्केसह र. रु. २३६४.८० कोटी जमा झाली आहे. म्हणजेच प्रत्यक्ष प्रारंभिक शिल्लक वगळुन र. रु.

२०६६.४७ इतकीच रक्कम जम झाली आहे. तसेच मागील तीन वर्षाची खर्चाची सरासरी १९७०.२६ कोटी असतांनामुळ अंदाजपत्रकानुसार खर्च रुपये २४७५.८६ कोटी अंदाजीत केलेला होता. प्रत्यक्षात रुपये २०३५.५४ कोटी प्रत्यक्ष खर्च केला आहे. यामुळे अंदाजपरकातील रकमा या वास्तवादी असण्याकडे यापुढे प्रयत्न व्हावेत. यापुढे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नियम क्र. २६ (३) तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०१३ मधील प्रकरण ३० नियम ४१६ प्रमाणे कार्यवाही करणेबाबत दक्षता घ्यावी.

१) सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष उत्पन्न व तरतुदी मधील मोठ्या फरकाबाबत :-

(लेखाशिर्षानिहाय काही उदा. दाखल जमा रक्कमांचा गोषवारा)

| अ.क्र | जमा बाजू लेखाशिर्ष | कोड नं. | मा. आयुक्त यांची मुळ अंदाजपत्रक र. रु लाखात | मा. महासभेने मंजुर केलेले अंदाजपत्र र. रु. लाखात | जमा रक्कम रुपये र. रु. लाखत | तफावत र. रु. (५-६)र. रु. लाखात | तरतुदीपेक्षा कमी उत्पनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जमिन, इमारती यावरील कर | ११०८ | ९७००.०० | ९७००.०० | ८२३०.४७ | १४६९.५३ | १५.१५% |
| २ | सर्वसाधारण स्वच्छता कर | १११६ | १७८५.०० | १७८५.०० | १५३७.४७ | २४७.५३ | १३.८७% |
| ३ | पथ कर | १११७ | १४८५.०० | १४८५.०० | १२७८.८९ | २०६.११ | १३.८८% |
| ४ | मनपा गाळे/ओटे जागा लायसेन्स फी | ११२३ | २०००.०० | २०००.०० | ८४४.६७ | ११५५.३३ | ५७.७७% |
| ५ | मनपा गाळे/ ओटे हस्तांतरण फी | १३६६ | २५.०० | २५.०० | ८.४२ | १६.५८ | ६६.३२% |
| ६ | जाहितार परवाना फी | १३७५ | १०००.०० | १०००.०० | ४३५.३३ | ५६४.६७ | ५६.४७% |
| ७ | जाहिरात जागा लायसेन्स फी | १३७६ | ५००.०० | ५००.०० | २०३.२३ | २९६.७७ | ५९.३५% |
| ८ | मनपा भुखंड बीओटी तत्वावर देणे | १२९६ | ५०००.०० | ५०००.०० | ७५.८८ | ४९२४.१२ | ९८.४८% |
| ९ | हार्डशिप प्रमिअम फी | १३५२ | २००.०० | २००.०० | ०.०० | २००.०० | १००.००% |
| १० | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अधिमुल्य | १३५५ | ९१६०.५० | ९१६०.५० | ६०८९.९१ | ३०७०.५९ | ३३.५२% |
| ११ | अनधिकृत बांधकाम | ११३८ | ९५०.०० | ९५०.०० | २१३.१७ | ७३६.८३ | ७७.५६% |
| १२ | बांधकाम परवानगी देतांना गटार जोडणी शुल्क | १३५३ | ३५०.०० | ३५०.०० | २३४.३६ | ११५.६४ | ३३.०४% |
| १३ | मोबाईल टॉवर फी | १२९४ | ५००.०० | ५००.०० | ५६.४० | ४४३.६० | ८८.७२% |
| १४ | जैविक कचरा विल्हेवाट व त्यावरील रॉयल्टी | १३४१ | ७५.०० | ७५.०० | ०.०० | ७५.०० | १००.००% |
| १५ | फेरिवाला दैनंदिन जागा लायसेन्स फी | १३१२ | ८००.०० | ८००.०० | ०.२२ | ७९९.७८ | ९९.९७% |
| १६ | स्थिर फेरिवाला लायसेन्स फी | १३१३ | ३००.०० | ३००.०० | ७३.३७ | २२६.६३ | ७५.५४% |
| १७ | महात्मा फुले जन आरोग्य योजना अनुदान | १३६८ | २५.०० | २५.०० | ०.०० | २५.०० | १००.००% |

| अ.क्र | जमा बाजू लेखाशिर्ष | कोड नं. | मा. आयुक्त यांची मुळ अंदाजपत्रक र. रु लाखात | मा. महासभेने मंजुर केलेले अंदाजपत्र र. रु. लाखात | जमा रक्कम रुपये र. रु. लाखत | तफावत र. रु. (५-६)र. रु. लाखात | तरतुदीपेक्षा कमी उत्पनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १८ | बांधकाम व पाडकाम कचऱ्यापोटी वापरकर्ता शुल्क | १३७१ | १००.०० | १००.०० | ०.०० | १००.०० | १००.००% |
| १९ | मोबिलायझेशन ॲडव्हान्स इंटरेस्ट जमा | १३७४ | ५०.०० | ५०.०० | ०.०० | ५०.०० | १००.००% |
| २० | मक्तेदार व अन्य सर्व अग्रीम जमा | ११९७ | १००.०० | १००.०० | १२.०९ | ८७.९१ | ८७.९१% |
| २१ | रस्ते बांधणी व त्याचे परिक्षण अनुदान | ११५० | ५००.०० | ५००.०० | ०.०० | ५००.०० | १००.००% |
| २२ | रोड डॅमेज फी | १३७७ | १५५००.०० | १५५००.०० | ७५७०.९९ | ७९२९.०१ | ५१.१५% |
| २३ | पाणी पुरवठा अभय योजना | १३६० | ५०.०० | ५०.०० | ०.०० | ५०.०० | १००.००% |
| २४ | रोड डॅमेज फी | १२१६ | १०००.०० | १०००.०० | २३९.५९ | ७६०.४१ | ७६.०४% |
| २५ | NULM कंत्राटी अस्थायी आस्थापना अग्रीम जमा | १३८१ | ५०.०० | ५०.०० | ०.०० | ५०.०० | १००.००% |
| **एकूण** | | | **५१२०५.५०** | **५१२०५.५०** | **२७१०४.४६** | **२४१०१.०४** | **४७.०७%** |

वरील उदाहरणादाखल लेखाशिर्षामध्ये मा. आयुक्त व मा. महासभा यांचे मुळ अंदाज पत्रकात र. रु. ५१२.०६ कोटी जमा अपेक्षित धरली होती. मात्र वर्षाअखेर ती प्रत्यक्षात र. रु. २७१.०४ कोटी इतकीच जमा झाली. म्हणजे र. रु. २४१.०१ कोटी इतकी कमी जमा झाली असुन, याप्रमाणे कमी रकमा मनपास प्रत्यक्षात जमा झालेल्या आहेत. मात्र उपरोक्त प्रमाणे महसुल गोळा होण्याच्या अपेक्षेने उत्पन्नापेक्षा जादा विविध विकास कामांची प्रकरणे सादर / मंजुर झालेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या दायित्वामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. सबब वार्षिक अंदाजपत्रक वास्तववादी असणे आवश्यक आहे.

४) सन २०२३-२४ मध्ये काही उदा. दाखल लेखाशिर्षामध्ये कोणत्याही प्रकारचे उत्पन्न (रकमा) जमा झालेले नाही.

| अ.क्र. | जाम बाजू लेखाशिर्ष | कोड नं. | मा. आयुक्त यांची मुळ अंदाजपत्रक (र. रु. लाखात) | मा. महासभेने मंजुर केलेले अंदाजपत्रक (र. रु. लाखात) | जमा (र. रु. लाखात) | तफावत (र. रु. लाखात) | तरतुदीपेक्षा कमी उत्पन्नाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्थानिक संस्था कर जमा | १३०२ | ५५.०० | ५५.०० | ००.०० | ५५.०० | १००% |
| २ | स्थानिक संस्था कर व्याज | १३०३ | १०.०० | १०.०० | ००.०० | १०.०० | १००% |
| ३ | टी.डी.आर इन्फ्रा स्ट्रक्चर फी | १३५१ | २२.०० | २२.०० | ००.०० | २२.०० | १००% |
| ४ | हार्डशिप प्रिमियम फी | १३५२ | २००.०० | २००.०० | ०.०० | २००.०० | १००% |
| ५ | जैविक कचरा विल्हेवाट व त्यावरील रॉयल्टी | १३४१ | ७५.०० | ७५.०० | ०.०० | ७५.०० | १००% |
| ६ | उद्यानापासुन मिळालेले उत्पन्न | ११२४ | १०.०० | १०.०० | ०.०० | १०.०० | १००% |
| ७ | महात्मा फुले जन आरोग्य योजना | १३६८ | २५.०० | २५.०० | ०.०० | २५.०० | १००.००% |

| अ.क्र. | जाम बाजू लेखाशिर्ष | कोड नं. | मा. आयुक्त यांची मुळ अंदाजपत्रक (रु. लाखात) | मा. महासभेने मंजुर केलेले अंदाजपत्रक (रु. लाखात) | जमा (रु. लाखात) | तफावत (रु. लाखात) | तरतुदीपेक्षा कमी उत्पन्नाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनुदान | | | | | | |
| ८ | बांधकाम व पाडकाम कचऱ्यापोटी वापरकर्ता शुल्क | १३७१ | १००.०० | १००.०० | ००.०० | १००.०० | १००.००% |
| ९ | मोबिलायझेशन ॲडव्हान्स इंटरेस्ट जमा | १३७४ | ५०.०० | ५०.०० | ०.०० | ५०.०० | १००.००% |
| १० | रस्ते बांधणी व त्याचे परिक्षण अनुदान | ११५० | ५००.०० | ५००.०० | ००.०० | ५००.०० | १००.००% |
| ११ | पाणी पुरवठा अभय योजना | १३६० | ५०.०० | ५०.०० | ०.०० | ५०.०० | १००% |
| १२ | NULM कंत्राटी अस्थायी आस्थापना अग्रीम जमा | १३८१ | ५०.०० | ५०.०० | ०.०० | ५०.०० | १००% |

वरील उदा. दाखल लेखाशिर्षात मोठ्या प्रमाणात तरतुद करण्यात आली होती, मात्र सदर लेखाशिर्षकात कोणत्याही रकमा जमा (उत्पन्न मिळालेले) झाल्याचे दिसुन येत नाही, अशा अनेक लेखाशिर्षात तरतुदी मोठ्या प्रमाणात अपेक्षित धरण्यात आल्या, मात्र उत्पन्न मिळालेले (रकमा जमा) नाही. तरी अर्थसंकल्पीय तरतुद वास्तववादी असण्याच्या दृष्टीने दक्षता घेणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. २ :- शासन निर्देशाप्रमाणे २१% राखीव खर्च बाबी बाबत.....**

विषयांकीत प्रकरणी खालील शासन आदेशान्वये अर्थसंकल्पीय तरतुदी विषद केलेल्या आहेत.

अ) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-१०९३/३२५/प्र.क्र. २४ नवि-३२ दि. १७/०४/१९९३ व नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-१०९३/११९८/नवि-१४ दि. १४/०७/१९९३ अन्वये महिला व बाल विकास कल्याण या साठी ५%

ब) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०१८/प्र.क्र. ५२/१८ नवि-२८ दि. १०/०५/२०१८ दिव्यांग व्यक्तींसाठी ५% राखीव निधी.

क) नगर विकास विभाग, आरोग्य मंत्रालय, मुंबई ३२ दि. ०३/०७/१९८२ अन्वये मागासवर्गीय कल्याणकारी योजना ५%

ड) नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. जीएन १०९८/प्र.क्र. २१/९८/नवि-२४ दिनांक ०९/०३/१९९८ अन्वये क्रिडा क्षेत्रासाठी ५%.

उपरोक्त शासन निर्देशाप्रमाणे महानगरपालिकेने अर्थसंकल्पीय तरतुदी करणे आवश्यक आहे.

सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात महानगरपालिकेने उक्तबाबींवर केलेल्या तरतुदी व खर्च नमुद करण्यात आला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

(रुपयेलाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२३-२४ मा. महासभेची तरतूद | सन २०२३-२४ केलेला प्रत्यक्ष खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | महिला व बाल विकास कल्याण कार्यक्रम ५% | २९७०.०० | ११९७.५७ | ४०.३२% |

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२३-२४ मा. महासभेची तरतूद | सन २०२३-२४ केलेला प्रत्यक्ष खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २ | दिव्यांग पुनर्वसन ५% | ४७२७.०० | १४८१.७५ | ३१.३४% |
| ३ | मागासवर्ग कल्याण ५% | २८९०.०० | १२४९.४८ | ४३.२३% |
| ४ | क्रीडा ५% | २५००.०० | २४९१.२३ | ९९.६४% |
| ५ | प्रशिक्षण १% | ०.०० | ०.०० | ०.००% |
| | एकुण | १३०८७.०० | ६४२०.०३ | ४९.०५% |

मा. शासन निर्णयानुसार उक्त लेखाशिर्षाकरीता त्या त्या टक्केवारीनुसार अंदाजपत्रकात आर्थिक तरतुद करणे बंधनकारक असतांनाही विभागाने त्यानुसार तरतुद न करता कमी जास्त प्रमाणात तरतुद केल्याचे दिसुन येते.

वरील खर्च आकडेवारी विचारात घेता, तरतुदीच्या ४९.०५% इतकाच खर्च करणेत आलेला आहे. म्हणजेच ५०.९५% इतका कमी खर्च करणेत आला. मा. शासन निकषानुसार खर्च करणे आवश्यक होते, परंतु विभागाने त्या नुसार अंदाजपत्रकात तरतुद व प्रत्यक्ष खर्च ही केलेला दिसुन येत नाही. मा. शासन निर्णयनुसार राखीव तरतुद न करणे व त्यानुसार खर्च न झाल्याबाबत खुलासा करावा. तरी मा. शासन निकषानुसार खर्च करण्याबाबत उपयोजना करणे आवश्यक आहे.

## परिच्छेद क्र. ३ :- अंदाजपत्रकीय तरतुद व खर्च आकडेवारी बाबत.....

वार्षिक लेख्यांची तपासणी केली असता मंजुर अंदाजपत्रकातील खर्च होणे आवश्यक होते. तथापि, सन २०२३-२४ चे सुधारीत अंदाजपत्रकातील काही लेखाशिर्षाची तरतुद व प्रत्यक्ष खर्च यामध्ये तफावत निदर्शनास आली आहे.

सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्च

(लाखात)

| अ.क्र. | खर्च बाजु लेखाशिर्ष | कोड नं. | तरतुद र. रु. | खर्च र. रु. | उणे खर्च र. रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | नाशिक पुर्व विभागीय कार्यालय स्थायी आस्थापना | २३४९ | ८२.०० | ८८.५८ | -६.५८ |
| २. | नाशिक पष्चिम विभागीय कार्यालय स्थायी आस्थापना | २६२५ | १९१.०० | १९७.७९ | -६.७९ |
| ३. | नाशिक पंचवटी विभागीय कार्यालय स्थायी आस्थापना | २३५० | २१६.०० | २३१.५९ | -१५.५९ |
| ४. | नाशिक रोड विभागीय कार्यालय स्थायी आस्थापना | २३५१ | ९०.०० | ९४.४१ | -४.४१ |
| ५. | नाशिक सातपुर विभागीय कार्यालय स्थायी आस्थापना | २३५२ | १४७.०० | १५३.४३ | -६.४३ |
| ६. | नविन नाशिक विभागीय कार्यालय स्थायी आस्थापना | २३५३ | २१५.०० | २२४.८४ | -९.८४ |
| ७. | द्विनोंद पध्दत कार्यान्वित करणे | २८१२ | ५०.०० | ९२.७४ | -४२.७४ |
| ८. | संगणक, स्टेशनरी, साहित्य व सॉफ्टवेअर खरेदी | २३५८ | १०.०० | १०.७५ | -०.७५ |
| ९. | स्थायी आस्थापना | २३६६ | ४१.०० | ४१.९८ | -०.९८ |
| १०. | स्थायी आस्थापना | २३६९ | ३८.०० | ६७.३८ | -२९.३८ |

| अ.क्र. | खर्च बाजु लेखाशिर्ष | कोड नं. | तरतुद र. रु. | खर्च र. रु. | उणे खर्च र. रु. |
|---|---|---|---|---|---|
| ११. | मुख्यालय स्थायी आस्थापना | ५०३६ | १९०.०० | १९९.३६ | -९.३६ |
| १२. | ना. पुर्व स्थायी आस्थापना | २३७४ | २४७.०० | २५५.६४ | -८.६४ |
| १३. | ना. पश्चिम स्थायी आस्थापना | २६४२ | १३६.०० | १४०.०२ | -४.०२ |
| १४. | ना. पंचवटी स्थायी आस्थापना | २३७५ | २४५.०० | २७७.०१ | -३२.०१ |
| १५. | ना. रोड स्थायी आस्थापना | २३७६ | २७५.०० | ३२४.२६ | -४९.२६ |
| १६. | सातपुर स्थायी आस्थापना | २३७७ | ९५.०० | ११६.९१ | -२१.९१ |
| १७. | नविन नाशिक स्थायी आस्थापना | २३७८ | २१५.०० | २३६.३९ | -२१.३९ |
| १८. | मुख्यालय स्थायी आस्थापना | २९२८ | ६०.०० | ६६.७१ | -६.७१ |
| १९. | ना. पुर्व स्थायी आस्थापना | २३८४ | ५५.०० | ५९.६७ | -४.६७ |
| २०. | ना. पश्चिम स्थायी आस्थापना | २६२८ | १२५.०० | १२९.५६ | -४.५६ |
| २१. | ना. पंचवटी स्थायी आस्थापना | २३८५ | १२०.०० | १२१.९५ | -१.९५ |
| २२. | ना. रोड स्थायी आस्थापना | २३८६ | ८६.०० | ९१.५२ | -५.५२ |
| २३. | सातपुर स्थायी आस्थापना | २९२९ | ८९.०० | ९१.७८ | -२.७८ |
| २४. | मिळकत मुख्यालय स्थायी आस्थापना | २४८८ | ६५.०० | ६८.३६ | -३.३६ |
| २५. | सामान्य प्रशासन स्थायी आस्थापना | २३२४ | ४१५.०० | ४३७.८० | -२२.८० |
| २६. | गोदावरी संवर्धन व्यवस्थापन स्थायी आस्थापना | २९७४ | ५५.०० | ५७.४२ | -२.४२ |
| २७. | जनसंपर्क स्थायी आस्थापना | २३२६ | ५८.०० | ५८.६१ | -०.६१ |
| २८. | समाजकल्याण स्थायी आस्थापना | २३२७ | १६०.०० | १७०.५० | -१०.५० |
| २९. | भांडार स्थायी आस्थापना | २३२८ | ४६.०० | ४९.१५ | -३.१५ |
| ३०. | नोदणी बटवडा स्थायी आस्थापना | २३२९ | ८०.०० | ८३.८७ | -३.८७ |
| ३१. | विधी स्थायी आस्थापना | २३३१ | ५८.०० | ५९.४८ | -१.४८ |
| ३२. | छपाई स्थायी आस्थापना | २९५२ | ६३.०० | ६६.६२ | -३.६२ |
| ३३. | सुरक्षा स्थायी आस्थापना | २३३२ | १०११.०० | १०६७.२८ | -५६.२८ |
| ३४. | रेकॉर्ड स्थायी आस्थापना | २३३० | १६५.०० | १७२.६२ | -७.६२ |
| ३५. | अग्निशमन स्थायी आस्थापना | २३९१ | १५३७.०० | १६३३.४६ | -९६.४६ |
| ३६. | विद्युत स्थायी आस्थापना | २३९५ | ९९५.०० | १०५१.९७ | -५६.९७ |
| ३७. | विजेचे उपकरणे देखभाल दुरूस्ती | २३९७ | २६२.०० | २६८.३४ | -६.३४ |
| ३८. | सार्व. उत्सवानिमित्त रोषणाई व हार घालने | २४०२ | ८४.०० | ८४.६८ | -०.६८ |
| ३९. | पशुसंवर्धन स्थायी आस्थापना | २४१५ | १६५.०० | १६८.४५ | -३.४५ |
| ४०. | मलेरीया स्थायी आस्थापना | २४२० | ४६०.०० | ४८५.०६ | -२५.०६ |
| ४१. | जे.डी.सी. बिटको दवाखाना स्थायी आस्थापना | २४३८ | २२४०.०० | २३२७.४२ | -८७.४२ |
| ४२. | डॉ. झाकीर हुसेन दवाखाना स्थायी आस्थापना | २६७८ | ८८८.०० | ९८२.३५ | -९४.३५ |
| ४३. | इंदिरा गांधी दवाखाना स्थायी आस्थापना | २४४६ | ६८५.०० | ७३५.४५ | -५०.४५ |
| ४४. | मोरवाडी दवाखाना स्थायी आस्थापना | २४५८ | ३६६.०० | ३७८.४० | -१२.४० |
| ४५. | मायको दवाखाना स्थायी आस्थापना | २४४० | ८७.०० | ९३.५० | -६.५० |
| ४६. | मायको प्रसुतीगृह स्थायी आस्थापना | २४४४ | १८७.०० | १८७.६४ | -०.६४ |
| ४७. | मुख्यालय स्थायी आस्थापना | २९९१ | ९७.०० | ११३.७३ | -१६.७३ |
| ४८. | उपनगर दवाखाना स्थायी आस्थापना | २४५४ | १४३.०० | १४७.३० | -४.३० |
| ४९. | दसक पंचक दवाखाना स्थायी आस्थापना | २४५५ | ८२.०० | ८७.५२ | -५.५२ |
| ५०. | जिजामाता प्रसुतीगृह स्थायी आस्थापना | २४४८ | १९८.०० | २२४.३७ | -२६.३७ |
| ५१. | गंगापुर दवाखाना स्थायी आस्थापना | २७१४ | ९५.०० | ९७.१८ | -२.१८ |
| ५२. | सावित्रीबाई फुले प्रसुतीगृह स्थायी आस्थापना | २४५० | ४०.०० | ४२.०६ | -२.०६ |

| अ.क्र. | खर्च बाजु लेखाशिर्ष | कोड नं. | तरतुद र. रु. | खर्च र. रु. | उणे खर्च र. रु. |
|---|---|---|---|---|---|
| ५३. | पिंपळगाव दवाखाना स्थायी आस्थापना | २४५६ | ९०.०० | ९२.५२ | -२.५२ |
| ५४. | मोबाईल दवाखाना स्थायी आस्थापना | २४५१ | २७.०० | २७.१७ | -०.१७ |
| ५५ | सार्व. बांध. स्थायी आस्थापना | २४६३ | ५१३.०० | ५४४.३७ | -३१.३७ |
| ५६ | ना. पुर्व स्थायी आस्थापना | २४६४ | २३१.०० | २४२.२६ | -११.२६ |
| ५७ | ना. पश्चिम स्थायी आस्थापना | २६३२ | २८३.०० | २९५.३४ | -१२.३४ |
| ५८ | पंचवटी स्थायी आस्थापना | २४६५ | ३९२.०० | ३९६.५० | -४.५० |
| ५९ | ना. रोड स्थायी आस्थापना | २४६६ | २३२.०० | २४४.०९ | -१२.०९ |
| ६० | सातपुर स्थायी आस्थापना | २४६७ | २०५.०० | २१३.५९ | -८.५९ |
| ६१ | नविन नाशिक स्थायी आस्थापना | २४६८ | १७७.०० | १८८.३२ | -११.३२ |
| ६२ | रस्ते दुरूस्ती | २४७२ | १४०८१.०० | १५३२८.४५ | -१२४७.४५ |
| ६३ | इमारत दुरूस्ती | २४७१ | ७९८.०० | ८५६.५४ | -५८.५४ |
| ६४ | पुल व सांडवे दुरूस्ती | २४७३ | ५०.०० | ५८.२० | -८.२० |
| ६५ | पुतळे दुरूस्ती | २४७७ | १८.०० | २१.८९ | -३.८९ |
| ६६ | अतिक्रमण मुख्यालय स्थायी आस्थापना | २४८३ | ६००.०० | ६१८.३८ | -१८.३८ |
| ६७ | वाहतुक व नियोजन स्थायी आस्थापना | २४९२ | २८०.०० | ३०५.९३ | -२५.९३ |
| ६८ | उद्यान स्थायी आस्थापना | २४९९ | १५१४.०० | १७३९.१० | -२२५.१० |
| ६९ | वीज बिले | २६९६ | ८६.०० | ९६.३६ | -१०.३६ |
| ७० | तारांगण स्थायी आस्थापना | २५०७ | २०५.०० | २११.९९ | -६.९९ |
| ७१ | तरणतलाव स्थायी आस्थापना | २५१० | २६५.०० | २७८.३० | -१३.३० |
| ७२ | घनकचरा मुख्यालय स्थायी आस्थापना | २४०६ | १८०.०० | १९७.०४ | -१७.०४ |
| ७३ | घनकचरा पुर्व स्थायी आस्थापना | २४०७ | ४११.०० | ४२२.५५ | -११.५५ |
| ७४ | घनकचरा पश्चिम स्थायी आस्थापना | २६३० | ४३०.०० | ४६०.८६ | -३०.८६ |
| ७५ | घनकचरा पंचवटी स्थायी आस्थापना | २४०८ | २६८४.०० | २८२५.४३ | -१४१.४३ |
| ७६ | घनकचरा ना. रोड स्थायी आस्थापना | २४०९ | २५७०.०० | २६७०.९९ | -१००.९९ |
| ७७ | घनकचरा सातपुर स्थायी आस्थापना | २४१० | १९३२.०० | २०३०.६६ | -९८.६६ |
| ७८ | घनकचरा न. नाशिक स्थायी आस्थापना | २४११ | २२४२.०० | २३४०.९१ | -९८.९१ |
| ७९ | सार्व. शौचालये विज बील | २६९० | २०४.०० | २०६.६९ | -२.६९ |
| ८० | घनकचरा मुख्यालय स्थायी आस्थापना | २७१७ | १०५.०० | ११०.७८ | -५.७८ |
| ८१ | घनकचरा स्थायी आस्थापना | २५१५ | ८२८.०० | ६६०.६२ | १६७.३८ |
| ८२ | वृक्ष निधी अंशदान | २६६६ | २५५.०० | २६९.५५ | -१४.५५ |
| ८३ | खुल्या जागांचे संरक्षण करणे | २७५७ | ३०९.०० | ३२२.९० | -१३.९० |
| ८४ | सार्व. शौचालय | २५८६ | ८०.०० | ८५.८७ | -५.८७ |
| ८५ | ग्रीन जीम साहित्य बसविणे | ५०४४ | १००.०० | १७६.५५ | -७६.५५ |
| ८६ | समाजकल्याण मलनिस:रण विषयक कामे | ५०६० | ३१६.०० | ३८७.८४ | -७१.८४ |
| ८७ | घनकचरा मुख्यालय स्थायी आस्थापना | २५५२ | १३४०.०० | १३८४.७४ | -४४.७४ |
| ८८ | गंगापुर फल्ट्रेशन स्थायी आस्थापना | २५५३ | ४१६.०० | ४७८.७१ | -६२.७१ |
| ८९ | पंचवटी पंपींग स्थायी आस्थापना | २५५४ | ४१९.०० | ४८०.८६ | -६१.८६ |
| ९० | चेंहडी पंपींग स्थायी आस्थापना | २५५५ | ३६८.०० | ४०७.५६ | -३९.५६ |
| ९१ | ना. पुर्व स्थायी आस्थापना | २५५६ | ११२.०० | १३८.८८ | -२६.८८ |
| ९२ | पा.पु. पंचवटी स्थायी आस्थापना | २५५७ | ४१.०० | ५४.६१ | -१३.६१ |
| ९३ | पा.पु. ना. रोड स्थायी आस्थापना | २५५८ | ६९.०० | ७३.८९ | -४.८९ |
| ९४ | पा.पु. सातपुर स्थायी आस्थापना | २५५९ | ६१.०० | ७४.३५ | -१३.३५ |
| ९५ | पा.पु. न. नाशिक स्थायी आस्थापना | २५६० | २७३.०० | २९३.०७ | -२०.०७ |
| ९६ | पा.पु. शासकीय बीले | २५६७ | २२३४.०० | २४२९.३९ | -१९५.३९ |
| ९७ | मलनिस:रण स्थायी आस्थापना | २५६९ | ८६५.०० | ९२५.१६ | -६०.१६ |
| ९८ | मलनिस:रण देखभाल दुरूस्ती | २५७० | ३००.०० | ३१९.७८ | -१९.७८ |

| अ.क्र. | खर्च बाजु लेखाशिर्ष | कोड नं. | तरतुद र. रु. | खर्च र. रु. | उणे खर्च र. रु. |
|---|---|---|---|---|---|
| ९९ | जलनिस:रण व्यवस्था | २६१३ | १०००.०० | १०३५.८५ | -३५.८५ |
| १०० | कामाठी स्थायी आस्थापना | ५००८ | ५७०.०० | ६०२.९२ | -३२.९२ |
| १०१ | गलिच्छ वस्ती स्थायी आस्थापना | २४८६ | ७५.०० | ९०.२१ | -१५.२१ |
| १०२ | NULM स्थायी आस्थापना | ५०८८ | २५.०० | २५.०३ | -०.०३ |

महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम कलम १०१ ते १०४ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्याअन्वये सदर खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक होते.

वरील लेखाशिर्षाचे खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झाल्याचे दिसुन येत अहे. रक्कम रुपये ३७९२.४१ लक्ष इतका खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेला आहे.

सुधारीत अर्थसंकल्पापेक्षा वेगवेगळ्या लेखाशिर्षकांतर्गत एकूण रक्कम रुपये ३७९२.४१ लक्ष एवढा जास्त खर्च झाल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८६ व महाराष्ट्र महानगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम २८ व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०१३ मधील नियम ४२४ नुसार अर्थसंकल्पीय शिर्षकाखाली तरतुद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नाही. सबब अंदापत्रकीय तरतुदीपेक्षा रुपये ३७९२.४१ लक्ष हा जादा झालेला खर्च दिसतो. सदरच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ ते १०४ व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०१३ मधील नियम ४२७ नुसार सदर कमी व जादा खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेले पुनर्विनियोजन मंजुर केलेले वरील लेखाशिर्षाचे दस्तऐवज उपलब्ध न दिल्याने सदरची पडताळणी करता आली नाही.

## परिच्छेद क्र. ४ :- सरकारी शिक्षण कर, रोजगार हमी कर व निवासी कर भरणा महाराष्ट्र शासकीय कोषागारात मुदतीत न केले बाबत.

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. ईवीसी/१०९७/प्र.क्र. २०५/ल-५ दिनांक ०३/०४/१९९८ अन्वये सरकारी शिक्षणकर आणि रोजगार हमी व निवासी कर महानगरपालिकेने वसुल केले नंतर मुदतीत महाराष्ट्र शासन कोषागारात करणे आवश्यक आहे. मात्र खालील तपशिलात नमुद केले नुसार मुदतीत भरणा केलेला नाही.

अ) सरकारी शिक्षण कर, रोजगार हमी कर व निवासी कर भरणा तपशिल

| माहे | सरकारी शिक्षण कर | रोजगार हमी कर | निवासी कर | प्रमाणक दिनांक | स. शि व रो. ह कर बँक वजावट दिनांक | निवासी कर बँक वजावट दिनांक | विलंब कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल २०२३ | १७२२१६०५ | ३०४५८२३ | १०१८८४३ | २५-०५-२०२३ | २९-०५-२०२३ | २९-०५-२०२३ | -- |
| मे २०२३ | ७२६४११४ | ११३३०६६ | ३५२७०४ | १२-०६-२०२३ | १६-०६-२०२३ | १६-०६-२०२३ | -- |
| जुन २०२३ | १२८४१६९० | १७९६१७८ | ७२७१६८ | १४-०७-२०२३ | १७-०७-२०२३ | १७-०७-२०२३ | -- |
| जुलै २०२३ | ८३६१४४२ | १२२९१३६ | ३७२२४४ | ११-०८-२०२३ | १७-०८-२०२३ | १७-०८-२०२३ | -- |
| ऑगस्ट २०२३ | ५१९१८४७ | ६५५१६३ | ३१८०२० | २२-०९-२०२३ | २०-१२-२०२३ | १८-१२-२०२३ | ४ महिने |
| सप्टेंबर २०२३ | ६५९६६६१८ | ९८३६४८० | ४२३२३५२ | २९-१२-२०२३ | ०२-०१-२०२४ | ०९-०१-२०२४ | ४ महिने |
| ऑक्टोंबर २०२३ | ३७६६८४१ | ६१२९८५ | १४७३३६ | २९-१२-२०२३ | ०२-०१-२०२४ | ०९-०१-२०२४ | ३ महिने |
| नोव्हेंबर २०२३ | ३५१८७२४ | ४३२५७३ | १६३१७२ | २९-१२-२०२३ | ०२-०१-२०२४ | ०९-०१-२०२४ | २ महिने |
| डिसेंबर २०२३ | ५१९१८४७ | ६५५१६३ | ३१८०२० | १६-०१-२०२४ | १९-०१-२०२४ | २१-०२-२०२४ | १ महिने |
| जानेवारी २०२४ | ५३५०१०२ | ७४४८७३ | ३१८७०३ | १५-०२-२०२४ | २२-०२-२०२४ | २३-०२-२०२४ | १ महिने |
| फेबुवारी २०२४ | ६७३४२५९ | ९९२९९८ | ३७९५८८ | २०-०३-२०२४ | २७-०३-२०२४ | २८-०३-२०२४ | १ महिने |
| मार्च २०२४ | ५७२२४१९९ | ९०६७५१९ | २७१६००५ | ०५-०६-२०२४ | ०५-०६-२०२४ | --- | --- |
| **एकूण** | **१९८६३३२८८** | **३०२०१९५७** | **११०६४१५५** | -- | -- | -- | |

महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर अधिनियम, १९७९ मधील कलम १२(४) व शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र. ८२/नवि-१६ दिनांक १५/०३/२०२१६ अन्वये महानगरपाकेस वसुल केलेल्या रक्कमेच्या ५ टक्के इतकी रक्कम नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे. त्यानुसार एकूण वसुल रक्कम १,१०,६४,१५५/- च्या ५ टक्के रक्कम रु. ५,५३,२०८/- मा. शासनाकडे मागणी केलेली आढळून येत नाही.

## ब) उपकर (सेस) भरणा तपशिल बाबत

| महिना व वर्ष | एकूण वसुल रुपये | एकूण वसुल रक्कमेचा १ % मनपाकडे जमा रुपये | उर्वरीत रक्कम शासनास जमा रुपये | शासनास जमा केल्याचा दिनांक | विलंबाने भरणा केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल २०२३ | २१८७२८२७ | २१८७२८ | २१६५४०९९ | २६/०५/२०२३ | -- |
| मे २०२३ | २४११२८९० | २४११२९ | २३८७१७६१ | १५/०६/२०२३ | -- |
| जुन २०२३ | २९०२७७३७ | २९०२७७ | २८७३७४६० | १२/०७/२०२३ | -- |
| जुलै २०२३ | १७६२६५९७ | १७६२६६ | १७४५०३३१ | ११/०८/२०२३ | -- |
| ऑगस्ट २०२३ | २८८२४४९५ | २८८२४५ | २८५३६२५० | १२/०९/२०२३ | -- |
| सप्टेंबर २०२३ | ३६३००४१४ | ३६३००४ | ३५९३७४१० | १२/१०/२०२३ | -- |
| ऑक्टोंबर २०२३ | ६०५५०१३१ | ६०५५०१ | ५९९४४६३० | २८/११/२०२३ | -- |
| नोव्हेंबर २०२३ | ३६४३३७०५ | ३६४३३७ | ३६०६९३६८ | ११/१२/२०२३ | -- |
| डिसेंबर २०२३ | २८४२५५४८ | २८४२५५ | २८१४१२९३ | १२/०१/२०२४ | -- |
| जानेवारी २०२४ | ३१८४५६२७ | ३१८४५६ | ३१५२७१७१ | १३/०२/२०२४ | -- |
| फेब्रुवारी २०२४ | ४३७३७५४८ | ४३७३७५ | ४३३००१७३ | १३/०३/२०२४ | -- |
| मार्च २०२४ | ४४७४४९२२ | ४४७४४९ | ४४२९७४७३ | १६/०५/२०२४ | एक महिना विलंब |
| **एकूण** | **४०३५०२४४१** | **४०३५०२२** | **३९९४६७४१९** | | |

उपकराचा भरणा विलंबाने केल्यास शासन निर्णय बीसीए २००९/प्र.क्र. १०८/कामगार ७-अ दिनांक १७/०६/२०१० परिशिष्ट -१ मधील मुद्दा क्र. १३ मधील कलम ८ नुसार २% व्याज आकारणी करण्याची तरतूद आहे. भविष्यात विलंबाने भरण्या केलेल्या व्याजाची/दंडाच्या रक्कमेची मागणी केल्यास याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील.

## क) प्रिमियम शुल्क आणि फायर इन्फ्रास्ट्रक्चर शुल्क बाबत

महाराष्ट्र राज्य बांधकामांसाठी "युनिफाईड विकास नियंत्रक आणि प्रोत्साहन नियमातील नियम २.२.१४ ए तरतुदीनुसार प्रिमियम शुल्क आणि फायर इन्फ्रास्ट्रक्चर शुल्क वसुल करुन ५०% शासनास भरणे आवश्यक आहे.

| माहे | एकुण वसुल रक्कम | एकुण वसुल रक्कमेवरील व्याज | एकुण रक्कम | सदर रक्कमेतील शासनास ५०% भरणा आवशयक रक्कम |
|---|---|---|---|---|
| एप्रिल २०२३ | ३८,६२,४९,४२८.०० | २४,९१,९५२.०० | ३८,८७,४१,३८०.०० | १९,४३,७०,६९०.०० |
| मे २०२३ | १०,६१,०६,६२१.०० | ३,६१,८२५.०० | १०,६४,६८,४४६.०० | ५,३२,३४,२२३.०० |
| जुन २०२३ | ६,५७,४३,७३४.०० | २,३०,४३,३५१.०० | ८,८७,८७,०८५.०० | ४,४३,९३,५४२.५० |
| जुलै २०२३ | ७,७४,१६,६७८.०० | १,५३,१२३.०० | ७,७५,६९,८०१.०० | ३,८७,८४,९००.५० |
| ऑगस्ट २०२३ | १०,९०,१४,३२४.०० | ८,७६,७७३.०० | १०,९८,९१,०९७.०० | ५,४९,४५,५४८.५० |

| माहे | एकुण वसुल रक्कम | एकुण वसुल रक्कमेवरील व्याज | एकुण रक्कम | सदर रक्कमेतील शासनास ५०% भरणा आवशयक रक्कम |
|---|---|---|---|---|
| सप्टेंबर २०२३ | १०,२०,१६,७७८.०० | २,६७,६१,४१३.०० | १२,८७,७८,१९१.०० | ६,४३,८९,०९५.५० |
| ऑक्टोंबर २०२३ | १९,०६,७०,४७९.०० | २,२९,६८५.०० | १९,०९,००,१६४.०० | ९,५४,५०,०८२.०० |
| नोव्हेंबर २०२३ | ९,७१,०१,०००.०० | ७,७४,६९१.०० | ९,७८,७५,६९१.०० | ४,८९,३७,८४५.५० |
| डिसेंबर २०२३ | ७,९०,३८,२०२.०० | २,८६,०३,७४६.०० | १०,७६,४१,९४८.०० | ५,३८,२०,९७४.०० |
| जानेवारी २०२४ | ८,१६,६७,९८३.०० | ५१,०४१.०० | ८,१७,१९,०२४.०० | ४,०८,५९,५१२.०० |
| फेब्रुवारी २०२४ | १४,९०,५३,५५६.०० | १०,८५,४७५.०० | १५,०१,३९,०३१.०० | ७,५०,६९,५१५.५० |
| मार्च २०२४ | २२,०१,०९,३६४.८० | २,९८,२६,०१९.०० | २४,९९,३५,३८३.८० | १२,४९,६७,६९१.९० |
| **एकुण** | **१,६६,४१,८८,१४७.८०** | **११,४२,५९,०९४.००** | **१,७७,८४,४७,२४१.८०** | **८८,९२,२३,६२०.९०** |

## परिच्छेद क्र. ५ :- वित्त व लेखा विभागाने केलेल्या गुंतवणुकीवरील आक्षेपित रक्कमे बाबत.

वित्त व लेखा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या प्रमाणित अभिलेखांच्या आधारे लेखापरिक्षण केले असता त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी आढळून येतात.

महानगरपालिका निधीचे गुंतवणुक रजिष्टरचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे रक्कमा अडकुन पडल्याचे दिसुन येते. श्रीराम सहकारी बँक नाशिक येथे वेळोवळी मुदत ठेवीमध्ये खालिल प्रमाणे गुतंवणुक केल्याचे दिसुन येते.

१) भविष्य निर्वाह निधी दि. २१/६/२००३ ते १८/०६/२००५ या कालावधीत एकुण २८ ठेवींची मुदत एकुण गुंतवणुक र.रु. ६,९५,१३,७५९/- इतकी आहे. मुदती नंतर रोखीकरण करुन व्याजासह रक्कम मनपाकडे जमा होणे अपेक्षित होते.

२) कर्ज निवारण निधी दि. ०३/०५/२००५ ते ०७/०६/२००५ या कालावधीत एकुण ७ ठेवींची मुदत एकुण गुंतवणुक र.रु. १,५५,८३,५०१/- इतकी आहे. मुदती नंतर रोखीकरण करुन व्याजासह रक्कम मनपाकडे जमा होणे अपेक्षित होते.

३) इमारत घसारा निधी दि. १२/०५/२००५ या कालावधीत एकुण १ ठेवींची मुदत एकुण गुंतवणुक र.रु. ७,९२,८३८/- इतकी आहे. मुदती नंतर रोखीकरण करुन व्याजासह रक्कम मनपाकडे जमा होणे अपेक्षित होते.

४) सुरक्षा अनामत दि. ०६/०३/२००४ या कालावधीतल एकुण १ ठेवींची मुदत एकुण गुंतवणुक र.रु. १०,००,०००/- इतकी आहे. मुदती नंतर रोखीकरण करुन व्याजासह रक्कम मनपाकडे जमा होणे अपेक्षित होते.

**श्रीराम बँकेत अडकुन पडलेल्या एकुण गुंतवणुकी बाबतचा गोषवारा**

१) भविष्य निर्वाह निधी र.रु. ६,९५,१३,७५९/-

२) कर्ज निवारण निधी र.रु. १,५५,८३,५०१/-

३) इमारत घसारा निधी र.रु. ७,९२,८३८/-

४) सुरक्षा अनामत र.रु. १०,००,०००/-

एकुण रक्कम रुपये **८,६८,९०,०९८/- +आज पावेतोचे व्याज**

उपरोक्त मुदत ठेवींची मुदत सन २००६ मध्ये पूर्ण झाल्याचे दिसुन येते. मुदतीनंतर व्याजासह मिळणा-या रक्कमेचे नुतनीकरण अथवा रोखीकरण केल्याचे दिसुन येत नाही. सदरची रक्कम श्रीराम बँकेत पडुन असल्याचे दिसुन येते. याबाबत वेळोवळी आक्षेप नोंदवुनही सदर रक्कमा आज पावेतो नाशिक महापालिकेस प्राप्त झालेल्या नाहीत सदरची बाब अंत्यत गंभीर स्वरुपाची आहे. सदर गुंतवणुकीच्या रक्कमा व त्यावर आज पावेतो होणारे व्याजासह होणारी एकुण रक्क्म प्राप्त होणे कामी विभागाने बँकेकडे केलेल्या पाठपुराव्या बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

उक्त ठेवी विनाव्याज बँकेकडे पडून असल्याने मनपाचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. याबाबत लक्षवेधण्यात येत आहे.

## परिच्छेद क्र. ६ :- सन २०२३-२४ याआर्थिक वर्षाचे जनरल अग्रीम, संगणक अग्रीम, घरकर्ज, वाहनकर्ज, सण अग्रीम, इ. वार्षिक लेख्यांमधील अनियमितते बाबत.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे जनरल अग्रीम, संगणक अग्रीम, घरकर्ज, वाहनकर्ज, सण अग्रीम, इ. वार्षिकलेख्यांमधीलअनियमिततेबाबत.

### १) संगणक अग्रीमची वसुली न झालेबाबत :-

महानगरपालिकेकडुन अधिकारी / कर्मचाऱ्यांना वाटप केलेल्या संगणक अग्रीम वसुलीची तपासणी केली असता परत फेडीची विहीत मुदत संपुन देखील खालील कर्मचाऱ्यांकडे संगणक अग्रीमची रक्कम येणे बाकी असल्याचे दिसुनयेते.

**वसुली ४० समान निर्धारीत हप्त्यांमध्ये.**

| अ. क्र. | कर्मचारी क्रमांक | आर्थिक वर्ष | कर्मचारीनाव | अग्रीम मंजुर दिनांक | वसुली पुर्ण होण्याची निर्धारीत दिनांक | वसुल / समायोजन बाकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९६२२ | २०१३-१४ | दिनेश शांताराम वाघ | १५/१०/१३ | १५/०२/१७ | ८,०००/- | -- |
| २ | ५८०९ | २०१४-१५ | बाळु विष्णु वैरागर | २९/४/१४ | २९/०८/१७ | १६,०००/- | |
| ३ | ३८०८ | २०१५-१६ | बोडके शरद खंडु | ३०/७/१५ | ३०/११/१८ | ८,५००/- | मयत |
| | | | | | **एकुण =** | **३२,५००/-** | |

उपरोक्त अ.क्र.१ ते ३ कर्मचाऱ्यांकडे संगणक अग्रीमची एकुण र. रु.३२,५००/- इतकी येणे बाकी आहे. अग्रीम परत फेडीची मुदत संपुष्ठात आली आहे, परंतु उर्वरीत रक्कम वसुल झालेली नाही. सदरची अग्रीम रक्कम विहीत मुदतीत वसुल होणे आवश्यक होते, त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही.

### २) सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातील जनरल अग्रीम बाबत :-

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कर्मचारी व मक्तेदारांना वेळो वेळी दिलेले अग्रीम तसेच मागील थकितअग्रीम रक्कम यांची सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात झालेली वसुली व अद्याप पावेतो वसुल न

झालेली एकुण वसुल झालेली व थकीत रक्कम व त्याचा गोषवारा इ. बाबीचे खतावणी केलेले अद्यावत रजिष्टर व अनुषंगीक दस्तऐवज लेखापरिक्षणास मिळणे कामी वेळो वेळी लेखी व तोंडी मागणी करुनही अद्याप पावेतो सदरचे दस्तऐवज उपल्बध करुन न दिल्याने सदर लेखापरिक्षण करता आले नाही.

**३) सन २०२३ - २४ या वित्तीय वर्षातील घरकर्ज वसुलीतील अनियमितते बाबत :-**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांना घरखरेदी, बांधणे व दुरूस्ती करीता वेळो वेळी दिलेले घरकर्ज अग्रीम तसेच मागील थकित घरकर्ज अग्रीम रक्कम यांची सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात झालेली वसुली व अद्याप पावेतो वसुल न झालेली एकुण वसुल झालेली व थकीत रक्कम व त्याचा गोषवारा इ. बाबीचे खतावणी केलेले अद्यावत रजिष्टर व अनुषंगीक दस्तऐवज लेखापरिक्षणास मिळणे कामी वेळो वेळी लेखी व तोंडी मागणी करुनही अद्याप पावेतो सदरचे दस्तऐवज उपल्बध करुन न दिल्याने सदर लेखापरिक्षण करता आले नाही.

**४) सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातील वाहनकर्ज वसुलीतील अनियमितते बाबत :-**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांना वाहनखरेदी करीता वेळो वेळी दिलेले वाहन खरेदी अग्रीम तसेच मागील थकित वाहनखरेदी अग्रीम रक्कम यांची सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात झालेली वसुली व अद्याप पावेतो वसुल न झालेली एकुण वसुल झालेली व थकीत रक्कम व त्याचा गोषवारा इ. बाबीचे खतावणी केलेले अद्यावत रजिष्टर व अनुषंगीक दस्तऐवज लेखापरिक्षणास मिळणे कामी वेळो वेळी लेखी व तोंडी मागणी करुनही अद्याप पावेतो सदरचे दस्तऐवज उपल्बध करुन न दिल्याने सदर लेखापरिक्षण करताआले नाही.

**५) महानगरपालिके कडुन दिल्या जाणाऱ्या सणअग्रीम मधील समायोजन/ वसुलीबाबत :-**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांना दिलेले सणअग्रीम उदा. दिवाळी, गोकुळ अष्टमी, ईद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इ. सणां करीता मनपा कडुन कर्मचाऱ्यांना सण अग्रीम दिल्याबाबत चे व मागील थकित सण अग्रीम यांचे विभागाने खतावणी केलेले प्रमाणित रजिष्टर व इतरअनुषंगीक दस्तऐवज यांची तपासणी केली असता सदर अग्रीमची वसुली १० समान हफत्यात होणे आवश्यक होते. परंतु सन नोव्हेंबर २०२२ ते ऑक्टोंबर २०२३ पावेतोची एकुण थकबाकी रक्कम रु. १,०१,२५०/- इतकी वसुली खालील प्रमाणे प्रलंबीत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी क्र. | रजि. पृष्ठ क्र. | कर्मचारी नाव | हुद्दा | सण | वसुल / समायोजन बाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९०७२ | ३३ | विलास मधुकर ढवळे | वाहन.चालक | दिवाळी | १,२५०/- |
| २ | ९२०५ | ३४ | विजय मधुकर भगुरे | हेल्पर | दिवाळी | ७,५००/- |
| ३ | ७८६८ | १२४ | सिध्दार्थ जयवंत शेवाळे | स. का. | दिवाळी | ५,०००/- |
| ४ | ७९७२ | १२९ | दिपक गणेश कच्छवाय | स. का. | दिवाळी | २,५००/- |
| ५ | ८८११ | १३२ | किशोर मधुकर साळवे | स. का. | दिवाळी | ३,७५०/- |
| ६ | १०१६२ | १५१ | समाधान भास्कर निकम | स. का. | दिवाळी | ३,७५०/- |
| ७ | ८४३४ | १६४ | मयुर धुळाजी काळे | बिगारी | दिवाळी | ७,५००/- |
| ८ | ७९७१ | २७७ | संतोष रामप्रसाद करोसे | स. का. | दिवाळी | ८,७५०/- |
| ९ | ९७८८ | २८६ | विजय किसन कागडा | स. का. | दिवाळी | ६,२५०/- |
| १० | ९९४२ | २८८ | संदिप एकनाथ लोढे | स. का. | दिवाळी | २,५००/- |
| ११ | ९५०४ | २९७ | संतोष रामप्रसाद चावरीया | स. का. | दिवाळी | २,५००/- |
| १२ | ९६६७ | २९७ | अंकुश सुरज शिंदे | स. का. | दिवाळी | ११,२५०/- |
| १३ | ७९६६ | ३१८ | नरेंद्र सोमनाथ भालेराव | स. का. | दिवाळी | १२,५००/- |
| १४ | ७६०४ | ३३२ | अनिल नाथु मोरे | बिगारी | दिवाळी | १२,५००/- |
| १५ | ७३११ | ४७१ | सुनिल विलास जगताप | स. का. | दिवाळी | ३,७५०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १६ | ७३६८ | ४७१ | कुणाल चारुदत्त रोकडे | स. का. | दिवाळी | ५,०००/- |
| १७ | १०११० | ४९८ | किशोर विष्णु गायकवाड | स. का. | दिवाळी | ५,०००/- |
| | | | | | एकुण र.रु | १,०१,२५०/- |

उपरोक्त प्रमाणे सण अग्रीम र. रु. १,०१,२५०/- इतकी रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांकडुन विहित वेळेत वसुल घेणे होते, तथापी तसे झाल्याचे दिसुन येत नाही.

**परिच्छेद क्र. ७ :- सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील लेखा विभागातील लेख्यांचे आक्षेप अंतिम करणेबबात ..**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सन २०३-२४ या आर्थिक वर्षातील मनपा लेखा विभागातील खजिना विभागामध्ये असलेल्या मनपा अधिकारी / कर्मचारी यांचे मासिक वेतन,जादा कामाचा मोबदला,वाहनचालक अतिकालीन भत्ता, कर्मचारी ७ वा वेतन आयोग फरक, कर्मचारी पुर्नविलोकन वेतन फरक, अधिकारी / कर्मचारी यांचे वाहतुक प्रतिपुर्ती व वाहतुक भत्ता इत्यादी लेखा विभागाने अदायागी केलेले देयके / प्रमाणक, नस्ती क्रमांक ई-००१ ते ई- ०७९ मधील सुमारे ४०४० देयके / प्रमाणकांची लेखापरिक्षणकामी पडताळणी केली असता त्यामध्ये आढळुन आलेल्या त्रुटी व अनियमिते बाबत उपरोक्त संदर्भ क्र.०१ ते ०६ ची पत्रे लेखा विभागास वेळोवेळी पाठविलेली आहेत. त्यामधील अग्निशमन विभागामधील कर्मचा-यांना जादा कामाचा मोबदला, कर्मचा-यांना दिलेला जाणारा धुलाई भत्ता, घाण भत्ता यांची लेखापरिक्षण विभागाने अर्धसमास ज्ञापनामध्ये नमुद केलेल्या रक्कमांची फक्त चालु प्रमाणकामधुन वसुली करणेत आलेली आहे. परंतु सदरील कर्मचा-यांना यापुर्वी कधी पासुन सदरील भत्ते लागु करणेत आलेले आहेत, यांची वित्त व लेखा विभागाने खात्री करुन सदर कर्मचा-यांना सदरील भत्ते लागु नसल्यास त्याची खात्री करुन यापूवी अदायगी झालेल्या रक्कम वसुली करणे आवश्यक आहे.

शासनपरिपत्रक क्र. लोलेस-२०१६/प्रक्र.०३/नवि-३१ दिनांक २२/०१/२०१६ अन्वये वार्षीक अहवाल सादर करणेकामी वेळेचे बंधन असल्याने याबाबत लेखापरिक्षण विभागाने उपरोक्त संदर्भिया पत्रान्वये व समक्ष वारंवार पाठपुरावा करणेत आलेला आहे. परंतु याचा कोणताही खुलासा लेखा व वित्त विभागाकडुन करणेत आलेला नाही. तसेच सन २०२३-२४ अहवाल अंतिम करणेची कार्यवाही सुरु आहे. सदरचे आक्षेप हे कायम करणेत येत असुन भविष्यामध्ये काही अनियमितता/अफरातफर आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लेखा व वित्त विभागाची राहील.

**परिच्छेद क्र. ८ :- सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील लेखा विभागातील लेख्यांचे आक्षेप अंतिम करणेबबात..**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सन २०३-२४ या आर्थिक वर्षातील मनपा लेखा विभागातील मनपा अधिकारी / कर्मचारी यांचे भनिनि चे ब्रॉडशिट व कर्मचा-यांचे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन (DCPS) चे ब्रॉडशिट व लेजर प्रमाणित करुन व मनपा निधिचे डे बुके प्रमाणित करुन उपलब्ध करुन देणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र.०१ ते ०६ ची पत्रे लेखा विभागास वेळोवेळी पाठविलेली आहेत. परंतु लेखा विभागामधुन अद्यापपावेतो संबंधिता कडुन उपरोक्त नमुद लेखे लेखापरिक्षणकामी उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

शासनपरिपत्रक क्र. लोलेस-२०१६/प्रक्र.०३/नवि-३१ दिनांक २२/०१/२०१६ अन्वये वार्षीक अहवाल सादर करणेकामी वेळेचे बंधन असल्याने याबाबत लेखापरिक्षण विभागाने उपरोक्त संदर्भिया पत्रान्वये व समक्ष वारंवार पाठपुरावा करणेत आलेला आहे. परंतु याचा कोणताही खुलासा लेखा व वित्त विभागाकडुन करणेत आलेला नाही. तसेच सन २०२३-२४ अहवाल अंतिम करणेची कार्यवाही सुरु आहे. सदरचे आक्षेप हे कायम करणेत येत असुन

भविष्यामध्ये काही अनियमितता/अफरातफर आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लेखा व वित्त विभागाची राहील.

## परिच्छेद क्र. ९ :- लेखा विभागाकडील सर्वसाधारण निधी डे बुक तपासणी बाबत.

सन २०२३-२४ या अर्थिक वर्षातील लेखा विभागाकडील सर्वसाधारण निधी डे बुकची पडताळणी केली असता खालिल प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.खालील रक्कमा बँकेत जमा परंतू डे बुकात जमा नसल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | दिनांक | रक्कम | अ.क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २३/०३/२०२३ | २६२१६५० | २९ | १२/०१/२४(९) | ३०००० |
| २ | २४/०३/२०२३ | ३३९९६०० | ३० | १९/०१/२४ | २४८०० |
| ३ | २३/०७/२०२३ | ८९९६२७ | ३१ | २०/०१/२४ | १५२१८९ |
| ४ | ०७/१०/२०२३ | २२५०८२ | ३२ | ०५/०२/२४ | ४५६० |
| ५ | १२/१०/२०२३ | २०५१७८ | ३३ | ०५/०२/२४ | ५४५२६२० |
| ६ | १३/१०/२०२३ | ४२२९६७ | ३४ | ०६/०२/२४ | ८०११० |
| ७ | १८/१०/२०२३ | ३०१०८ | ३५ | ०७/०२/२४ | ५००५० |
| ८ | १८/१०/२३ | ११०६०० | ३६ | १५/०२/२४ | ६३०० |
| ९ | १९/१०२३ | ७९८० | ३७ | १७/०२/२४ | २२४३० |
| १० | २१/१०२३ | २००० | ३८ | २१/०२/२४(१३) | ७८००० |
| ११ | ३१/१०/२३ | २७०६६ | ३९ | २२/०२/२४ (६) | ५१००० |
| १२ | १/११/२३ | ३००० | ४० | २३/०२/२४(२) | ३३६७२५ |
| १३ | १/११/२३ | ३००० | ४१ | २६/०२/२४(२) | ३३००० |
| १४ | ७/११/२३ | २१२३४ | ४२ | २७/०२/२४ | ११५८५ |
| १५ | २४/११/२३ | १४८०४० | ४३ | २९/०२/२४ | ५२१५ |
| १६ | २८/११/२३ | ४५५ | ४४ | १३/०३/२४ | १०६२० |
| १७ | ६/१२/२३ | ४९२६ | ४५ | १४/०३/२४ | १२२९ |
| १८ | ११/१२/२३ | ३३५६५ | ४६ | १५/०३/२४(२) | ४८००० |
| १९ | १६/१२/२३ | ५८८५ | ४७ | १६/०३/२४ | २९३०७ |
| २० | १८/१२/२३ | ३८८००६ | ४८ | २०/०३/२४ | ४०००० |
| २१ | १९/१२/२३ | ५५५९ | ४९ | २१/०३/२४(१३) | २०२८२८९ |
| २२ | २८/१२/२३ | १६८०० | ५० | २७/०३/२४ | ५७८८ |
| २३ | २८/१२/२३ | ६००० | ५१ | ३०/०३/२४(६) | ८३०९५ |
| २४ | २९/१२/२३ (१८) | ४७५०० | ५२ | ३१/०३/२४ (६) | ३३००० |
| २५ | ३/०१/२४ | २०६८ | ५३ | | |
| २६ | ३/०१/२४ | ३००० | ५४ | | |
| २७ | ०६/०१/२४ | ३८३५ | ५५ | | |
| २८ | १०/०१/२४ | २३६० | ५६ | | |

वरिल रक्कमा बँकेत जमा आहे परंतू डे बुकात जमा झाल्याचे आढळून येत नाही.

## परिच्छेद क्र. १० :- लेखा विभागाकडील सर्वसाधारण निधी डे बुक तपासणी बाबत.

लेखा विभागाकडील सर्वसाधारण निधी डे बुकची पडताळणी केली असता खालिल प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.खालील धनादेश मनपाने काढले परंतु बॅकेत न वटल्याने सदरच्या रक्कमा डे बुकात जमा नसल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | चेक नं. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ५७४४३७ | ३०/११/२०२३ | १९२० |
| २ | ५७४५७९ | १६/०१/२०२४ | ३५० |
| ३ | ५७४६६४ | २/२/२०२४ | १६०१० |
| ४ | ५७४७७१ | १५/०२/२०२४ | ३५० |
| ५ | ८०६६९९ | १७/३/२०२४ | १५९१० |
| ६ | ८०६७३९ | ७/३/२०२४ | १००० |
| ७ | ८०६७६६ | १२/०३/२०२४ | ३४० |
| ८ | ८५९८६९ | १९/०३/२०२४ | ६६० |
| ९ | ८५९९२३ | २१/०३/२०२४ | १०००१० |
| १० | ८५९९२४ | २१/०३/२०२४ | १०००१० |
| ११ | ८५९९३१ | २१/०३/२०२४ | ८४१५८४ |
| १२ | ८५९९३२ | २१/०३/२०२४ | ८४१५८४ |
| १३ | ८५९९७४ | २७/०३/२०२४ | ९१८८ |
| १४ | ८८६८३६ | ३१/०३/२०२४ | ६२०७ |

वरिल धनादेश मनपाने काढले परंतु बॅकेत न वटल्याने सदरच्या रक्कमा डे बुकात जमा नसल्याचे आढळून आले.

**परिच्छेद क्र. ११ :- लेखा विभागाकडील सर्वसाधारण निधी डे -बुक तपासणी बाबत.**

सन २०२३-२४ या अर्थिक वर्षातील लेखा विभागाकडील सर्वसाधारण निधी डे- बुकची पडताळणी केली असता खालिल प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

बँकेमधुन वेळो वेळी काढण्यात आलेल्या रक्कमा व केलेल्या व्यवहारावर बँकेने चार्जेस लावण्यात आले असुन, सदरचे चार्जेस कपात केले आहे ते डे बुकात जमा नसल्याचे आढळून येते. सदरच्या रक्कमा हया मनपा खाते नंबर ३२१६६२७७०९१ मध्ये र रु. १९,३३३.६९ मधुन कपात करण्यात आल्या आहे.

मनपाचे सर्व आर्थिक व्यवहार स्टेट बँक ऑफ इंडिया या बॅकेत असुन कोणत्याही प्रकारचे शुल्क मनपास लागु नाही. तरी सदरचे आकारलेले शुल्क परत मिळणे बाबत विभगाने पाठपुरावा करुन सदर रक्कमा मनपा खाती जमा करुन या कार्यातयास अवगत करावे.

**परिच्छेद क्र. १२ :- अनामतींचे वार्षिक लेख्यांची तपासणीबाबत.**

लेखा शाखेकडून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे उपलब्ध करून दिलेले अभिलेखे यांची लेखा संहिता, २०११ नुसार पडताळणी केली असता संदर्भ क्र ३ अन्वये आढळून आलेल्या अनियमितताबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

- **लेखा पुस्तके ठेवण्याची रीत महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम ६४ व ६५ (१) प्रमाणे**

  हस्तलिखित स्वरुपात ठेवण्यात आलेले तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. तसेच लेखे संगणकीकृत स्वरूपातील लेखे आणि नोंदवह्या यांची मुद्रितेवर विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या शेवटी काढण्यात आलेल्या मुद्रीतांची बांधणी, पृष्ठांकन अनुक्रमित करून मनपाची सामान्य मुद्रा व लेखा प्रमुखाची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

- **प्राप्त झालेल्या अनामत रकमा**

नियम २८९ नुसार प्राप्त झालेल्या ठेवींचे दोन प्रकारात वर्गीकरण करून त्यांचे स्वतंत्र रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. लेखा संहिता प्रकरण २० प्रमाणे स्वीकारलेल्या ठेवींचे १) अल्पमुदत ठेव व २) दीर्घ मुदत ठेव याप्रमाणे वर्गीकरण करून लेखे ठेवणे आवश्यक आहे त्याप्रमाणे लेखे तयार करून विभागाने तपासणीसाठी उपलब्ध करून दिलेले नाहीत.

नियम २९५ नुसार प्राप्त झालेल्या अनामत रकमांच्या बाबतीत नमुना २४ मध्ये प्राप्त झालेल्या अनामत रकमांची नोंद वही ठेवण्यात येईल या नोंदवहीमध्ये प्रपात झालेल्या अनामंत रकमांचे प्रकार, कार्यादेश क्रमांकाचे तपशिल, अनामत रकमा कशाबद्दल प्राप्त झालेल्या आहे याचा तपशील, अनामत रकमांबाबतच्या शर्ती, दिनांक, परतफेडीचा देय दिनांक इत्यादीसंबंधी निरनिराळ्या वर्गाकरिता स्वतंत्र पृष्ठावर नोंदी ठेवलेबाबत नमुद आहे. मात्र याप्रमाणे विहित नमुन्यातील नोंदींचे रजिस्टर पडताळणीसाठी उपलब्ध करून दिलेले नाही.

- **मुदत बाह्य आणि दावा न सांगितलेल्या अनामत रकमा**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्र १९० ( ३ ) अन्वये तीन वर्षापर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी रक्कमा, प्रत्येक वर्षअखेर व्यपगत होतील, काम पुर्ण होऊन निविदा अटी-शर्तीनुसार परतावा न केलेल्या अनामत रकमा पक्क्या सदरी जमा करून तशी नोंद स्वतंत्र वर्गीकरण रजिस्टर मध्ये घेणे आवश्यक आहे, तसेच अशा पक्क्या सदरी जमा झालेल्या रकमा परतावा करतेवेळी मा. आयुक्त सो. यांचे मंजुरीने अदा करणे आवश्यक आहे, तथापि विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उदा.-

| अ. क्र. | व्हाऊचर क्र. दिनांक | पावती पुस्तक क्र. व दिनांक | मक्तेदाराचे नांव | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | क्र.१७६<br>दि.१०/०८/२३ | क्र.२८५९/३०<br>दि.१५/०५/२०१७ | J.K. Construction | १९,६७०/- | तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी |
| २ | क्र.१८०<br>दि.१७/०८/२३ | क्र.२९२८/८१<br>दि.११/०७/२०१८ | चे. क्रांती मजूर बांध. | २,५४५/- | तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी |
| ३ | क्र.२१७<br>दि.१५/०९/२३ | क्र.५८९/५८<br>दि.२६/०७/२००४<br>क्र.१८७६/३५<br>दि.१४/१२/२०११ | शौकत इब्राहीम सैय्यद | ५,०००/-<br>२०,०००/- | मूळ पावती संलग्न केलेली नाही व तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी |

- **अनामत रकमा परत करणे**

1. महाराष्ट्र लेखा संहिता नियम २९६,२९७, व २९८ अन्वये पूर्तता विभागाने केलेली नाही. करारनामा अटी व शर्तीनुसार कामाच्या समाधाकारकरित्या पूर्ततेनंतर सुरक्षा अनामत ठेव परत करतांना परतावा देते वेळी परतावा मंजुरी संचिकेत, काम पूर्णत्व दाखला, कामाचे देयक, करारनामा प्रत संलग्न नाही, त्यामुळे परतावा प्रकरणांमध्ये कामाचा D.L.P ( Diffect Liability Period ) नमूद नसल्याचे आढळते. तसेच स्वीकारलेल्या रकमांच्या पावत्या परतावा मंजुरीसाठी सादर न केल्याने सदर रकमा दुबार देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उदा. –

| अ.क्र. | व्हाऊचर क्र. दिनांक | पावती पुस्तक क्र. व दिनांक | मक्तेदाराचे नाव | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | क्र.२७०<br>दि.३१/१०/२३ | क्र.३१५५/६१<br>दि.१७/२/२०२२<br>क्र.३१६८/८७<br>दि.२५/०५/२०२२ | श्री संतोष कचरू धात्रक | १,११,४१३/- | कामाची देयक प्रत संलग्न केलेली नाही. |
| २ | क्र.१५<br>दि.१२/०५/२०२३ | क्र.३०३७/९०<br>दि.२५/०६/२०२० | मे.एम.जी.नायर | ११,०२६/- | कामाची देयक प्रत संलग्न केलेली नाही. |

| अ.क्र. | व्हाऊचर क्र. दिनांक | पावती पुस्तक क्र. व दिनांक | मक्तेदाराचे नाव | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ३ | क्र.२३६<br>दि.१०/१०/२०२३ | क्र. ३१६८/२४<br>दि.११/०५/२२<br>क्र.३१५०/३७<br>दि.२६/११/२०२१ | विनोद अर्जुनदास लुथ्रा & असो. | १८,२६८/-<br><br>५१,१५१/- | करारनामा प्रत संलग्न नाहीत्यामुळे , मध्ये परतावा प्रकरणां P.L.D कामाचा लक्षात येत नाही. |
| ४ | क्र.२४७<br>दि.१६/१०/२०२३ | क्र. ३२१७/८५<br>दि.२१/०६/२३<br>क्र.३१९४/६०<br>दि.१३/१०/२२<br>क्र.३२०४/२४<br>दि.३१/०३/२३ | मे.ए.एस.सोनजे | ३९,१९७/-<br><br>३९,२४३/-<br><br>४४,८६२/- | करारनामा प्रत संलग्न नाहीत्यामुळे , परतावा प्रकरणांमध्ये P.L.D चाकामा लक्षात येत नाही. |
| ५ | क्र.१९७<br>दि.१२/०७/२०२३ | क्र. ३०३७/४२<br>दि.२२/०६/२०<br>क्र.२११०/९७<br>दि.०२/०३/२०१९ | Prasad Construction | ६२,२२७/-<br><br>६२,२२७/- | मूळ पावती संलग्न केलेली नाही |

**अक्षेपित बाबी –**

१. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता प्रकरण ५ मधिल नियम ६२, ६५ (१) व नियम ४७७ ते ४८२ प्रमाणे मधील तरतुदीनुसार संगणकीकृत लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.

२. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, २०११ प्रकरण २० प्राप्त झालेल्या अनामत रकमा मधील नियम क्र. २९७ नुसार ठेवींचा परतावा मिळण्यासाठी ठेवीदार रोखापालाकडे मूळ ठेवीची पावती सादर करील. परंतु विभागाने याप्रमाणे कार्यवाही अनुसारलेली नाही. विभागाने अनामत रक्कम परतावा प्रस्ताव संचिकेत मक्तेदारांकडून मूळ पावत्या ताब्यात घेवून प्रस्तावासोबत संलग्न केलेल्या नाही. उदाहरण दाखल तक्त्यात नमूद आहे.

३. विहित मुदतीत परतफेडी न केलेल्या अनामत रकमा पक्क्या सदरी जमा केल्याबाबत स्वतंत्र प्रमाणित नोंदवही तयार करून तपासणीसाठी सादर केलेली नाही. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात किती अनामत रक्कम जमा झाली, किती रक्कम सक्षम मान्यतेने परत केली व किती शिल्लक रक्कम पक्या सदरी जमा झाली याची पडताळणी करता आली नाही.

४. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, २०-११ प्रकरण २० मधिल नियम २८९ व २९० मधील तरतुदीनुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनामत रकमांचे विहित असलेल्या कार्यपद्धती व नमुन्यात ठेवलेले वर्गीकृत ( अल्प मुदत / दीर्घ मुदत ठेव ) लेखे अद्ययावत व प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करून तपासणी करणेकामी त्वरित उपलब्ध करून देण्यात यावे.

५. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता प्रकरण २० मधिल नियम २९५ मधील तरतुदीनुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ४३३ प्रकरणांचे मक्तेदार निहाय अनामत सदरी जमा करण्यात आलेल्या रकमांची माहिती व विहित नमुन्यात ठेवलेले ( नमुना क्र. २४ मध्ये ) लेखे, अनुषंगिक तपशिल, मुळसंचिका, अनामत रजिस्टर व अनुषंगिक अभिलेखे तपासणी करणेकामी दस्तऐवज त्वरित उपलब्ध करून देण्यात यावे.

६. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता प्रकरण २० मधिल नियम २९६ ते २९८ मधील तरतुदीनुसार १ ते २३ संचीकांतील नमूद एकूण ५९१ प्रकरणांचे मक्तेदार निहाय अनामत सदरी रिफंड ( परत फेड ) करण्यात आलेल्या रक्कमांची माहिती, अनामत परतावा ( ब्रॉड शिट ) रजिस्टर, व अनुषंगिक तपशील त्यांची यादी व अनुषंगिक अभिलेखे तपासणी करणेकामी दस्तऐवज उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

७. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता प्रकरण ३४ मधिल नियम ४७८ मधील तरतुदीनुसार संगणकीकृत ठेवण्यात मुद्रित लेखांच्या सारांशावर प्राधिकृत अधिकारी यांनी प्रमाणित करून योग्य क्रमांक व योग्य प्रकारे बांधणी करावी, असे नमूद आहे. त्याप्रमाणे विभागाने लेखे अभिरक्षित केलेले नाही.

## परिच्छेद क्र. १३ :- अग्निसुरक्षा निधी ताळमेळ व खर्चाबाबत.

१. महाराष्ट्र आगप्रतिबंध आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००७ प्रकरण ७ कलम २५ (१) आग सुरक्षा निधी या नावाने संबोधला जाणारा एक विशेष निधी स्थापन करून त्यात या अधिनियमान्वये बसविण्यात व गोळा करण्यात आलेली फी त्या मध्ये जमा करण्यात येईल या प्रमाणे तरतुद आहे. यानुसार मनपा कडून मालमत्ता करात अग्निनिवारण करापोटी (कोड नं ११४) सर्वसाधरण कराच्या २ टक्के इतकी रक्कम आकारली जाते या व्यतिरीक्त (कोड नं २३८) अग्निशामक सुरक्षा निधी (आग्निशमन दाखला फी, तपासणी फी, नुतणीकरण, तात्पुरत्या स्वरूपाची व्यवस्था आगविझविण्याची फी बिल्डिंग परवाना साठी NOC ) इ. पोटी आकारण्यात येणारे शुल्क जमा केले जाते.

२. कलम २५ (२) संबंधित प्रधिकरणाच्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये या विशेष निधीचा तपशिल देण्यात येईल आणि संबंधित प्रधिकरणाला लागु असलेल्या सबंध्द कायद्यामध्ये किंवा त्या अन्वये करण्यात आलेल्या नियमामध्ये व आदेशामध्ये विहित केले असेल अशा कार्यपध्दतीनुसार या निधीचे लेखे ठेवण्यात येतील अशी तरतुद आहे. तथापि यानुसार लेखे पडताळणीसाठी उपलब्ध झाले नाहीत.

३. कलम २५ (२) नुसार या अधिनियमाच्या तरतुदींना आधिन राहून आणि राज्यशासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेषत: आदेशाला आधिन राहून सर्वसाधारणत: अग्निशामक पथक सेवाचालविण्यासाठी ज्यात (अग्निशामक अधिकारी कर्मचारींचे वेतन आणी भत्ते व इतर अनुषंगिाक खर्च यांचा समावेश असेल) आणी विशेषत: प्राधिकरणाच्या हद्यितील अथवा हद्यिबाहेर कोणत्याही जमिनीवर किंवा कोणत्याही इमारतीस आगीस प्रतिबंध करण्याचा किंवा आगविझविण्याच्या प्रयोजनार्थ आत्याधुनिक साधन सामुग्री व उपकरणे पुरविण्यासाठी यानिधीतिल रक्कम वापरण्यात येईल आणि या अधिनियमामध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी ती वापरता येणार नाही याप्रमाणे तरतुद आहे. तथापि याप्रमाणे कार्यवाही होत नाही मालमत्ता करातुन मिळणारा २ टक्के अग्निनिवारण करीता (कोड नं ११४) रक्कम सर्वसाधारण निधीमध्येच ठेवलेली आहे, सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात व्याजासह रक्कम रूपये १०,१८,२६,४३३.१६/- (कोड नं ११४) आगसुरक्षा निधीत जमा झालेली दिसुन येते.

४. अग्निशामक विभागाचा आस्थापना खर्चासह इतर सर्व खर्च सर्वसाधारण निधीतुन (जनरलफंड) केला जातो सदर बाब अनियमित असल्याने याबाबत विभागाने उपरोक्त अधिनियमान्वये लेखे ठेवणे व त्याबाबत उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

## परिच्छेद क्र. १४ :- नाशिक महानगरपालिकेस प्राप्त होणारे केंद्र व राज्य शासन निधी, कर्ज यांचे ताळमेळा बाबत

मनपास शासनाकडून विविध योजनांसाठी केंद्र पुरस्कृत/राज्य पुरस्कृत निधी प्राप्त होत असतात. उदा. अमृत, अमृत-२.०, स्वच्छ भारत, जे.एन.एन.यु.आर.एम., सिहंस्थ, एन.आर.एच.यु.एम, मलेरिया, इतर तत्सम योजना यासाठी वित्त व लेखा विभागातील लेख्यांमधील शिल्लक, बँकेतील शिल्लक बाबत माहिती व लेखे उपलब्ध करुन न दिल्याने त्याबाबतची पडताळणी करण्यात आलेली नाही.

## परिच्छेद क्र. १५ :- अखर्चित रक्कमां बाबत

शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीबाबत व दि. ३१/०३/२०२४ अखेरीस शासकीय (केंद्र व राज्य शासन) अनुदानातील अखर्चित असलेल्या निधीच्या रक्कमांची माहिती उपलब्ध करुन न दिल्याने त्याबाबतची पडताळणी करण्यात आली नाही. तरी विभागाने अखर्चित रक्कम किती व शासनास भरणा केला का? याबाबत खुलासा होणे

आवश्यक आहे. तसेच त्याच्या विनियोगाबाबतची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त संदर्भानुसार विभागाने केलेला खुलासा संयुक्तीक वाटत नाही.

## परिच्छेद क्र. १६ :- उपर्जित तत्वावर आधारित — दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी बाबत.

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. लेखासं-१०/२०२४/७१ प्र.क्र./०४ निवि-३ दिनांक ०६/०७/२००५, व राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिका (NMAM) २००४ मधील प्रकरण ३२ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिनांक ०१/०४/२००५ पासुन व महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. स्था. १८/ब/मनपा/वार्षिक लेखे प्रमाणिकरण/५९३ दिनांक २१/०७/२०२२ अन्वये उपर्जित पध्दतीवर आधारित द्विनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करावयाची आहे. त्याप्रमाणे कार्यवाही सत्वर पूर्ण करणेकडे लेखा विभागाने पाठपुरावा करणे आवश्यक होते. केंद्र व राज्य शासनाकडुन पुरस्कृत (अमृत, अमृत — २.०, स्वच्छ भारत योजना, जे.एन.एन.यु.आर.एम., सिहंस्थ, एन.आर.एच.यु.एम, मलेरिया, एन कॅप व इतर तत्सम योजना) उपक्रम राबविण्यासाठी निधी उपलब्धते बाबत सदरची बाब आवश्यक अहर्ता असल्याने द्विनोंद लेखापध्दती बंधनकारक आहे. तरी सदर कामकाजाबाबतचा प्रगती अहवाल देण्यात यावा. केंद्र पुरस्कृत निधी मनपास प्राप्त होणेसाठी (अमृत, अमृत — २.०, स्वच्छ भारत योजना, जे.एन.एन.यु.आर.एम., सिहंस्थ, एन.आर.एच.यु.एम, मलेरिया, एन कॅप व इतर तत्सम योजना) साठी सदरची बाब महत्वाची असल्याने याबाबत द्विनोंद लेखा पध्दतीचा ताळेबंद झालेला दिसुन येत नाही.

द्विनोंद लेखा पध्दतीनुसार प्रत्येक आर्थिक वर्षाचा ताळेबंद, नफातोटा पत्रक, जमा-खर्च लेखे तयार होणे आवश्यक आहे. याबाबत विभागाने वार्षिक ताळेबंद वेळीस पुर्ण करण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेत उपार्जित तत्वावरील द्विनोंद लेखा पध्दतीवर आधारीत दिनांक ३१/०३/२०२४ अखेरचा ताळेबंद तयार करुन त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असतांना लेखापरिक्षण कालावधी पर्यंत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

## परिच्छेद क्र. १७ :- बॅक गॅरंटीचे अभिलेखे बाबत.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मनपाच्या शासकीय उदा. पाणी पुरवठा यांत्रिकी, वितरण, विद्युत , भुसंपादन या विभागांचे न्यायालयीन प्रकरणाबाबत व इतर कामाकरीता देण्यात आलेल्या बँक गॅरंटीचे अभिलेखे व तद्नुषंगिक लेखे लेखापरिक्षण कामी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे त्याबाबतची खात्री करता आलेली नाही.

शासन परिपत्रक क्र. लोलेस-२०१६/प्र.क्र./नवि-३१ दिनांक २२/०१/२०२१६ अन्वये वार्षिक अहवाल सादर करणे कामी वेळेचे बंधन असल्यानेतसेच लेखापरिक्षण कालमर्यादेत पुर्ण करावयाचे असल्याने उपरोक्त माहिती व प्रमाणित अभिलेखे सत्वर उपलब्ध करुन देणे बाबत वित्त व लेखा विभागास उपरोक्त पत्रान्वये व समक्ष अंति वारंवार मागणी करुनही विभागाने लेखे उपलब्ध करुन दिले नाही. सदरच्या अभिलेख्यामध्ये काही अपहार व अनियमितता, मनपाचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील.

## परिच्छेद क्र. १८:- मनपाच्या खजिन्यात जमा होणारा सर्व प्रकारचे ऑनलाईन भरणाचे लेखे प्राप्त न झाले बाबत.

मनपा खजिन्यात जमा होणा-या सर्व प्रकारचे ऑनलाईन भरणाद्वारे प्राप्त झालेल्या रक्कमांचे प्रमाणित लेखे लेखापरिक्षण कामी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे बँकेतील जमा रक्कम व डे-बुक वरील नोंदी यांचा ताळमेळ घेता आला नाही.

## परिच्छेद क्र. १९:- संगणकीकृत लेखे पुस्तके बाबत.

महाराष्ट्र महानगरपरिषद लेखा संहिता नियम ६२, ६५(१) व नियम ४७७ ते ४८२ प्रमाणे संगणकीकृत स्वरुपातील लेखे आणि नोंदवह्या यांची मुद्रितेवर विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या शेवटी काढण्यात आलेल्या मुद्रीतांची बांधणी, पृष्ठांकन अनुक्रमित करुन मनपाची सामान्य मुद्रा व लेखा प्रमुखाची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. उदा. भविष्य निर्वाह निधी लेखे, अनामत लेखे इत्यादी.

## परिच्छेद क्र. २०:- महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या निधींचे लेख्यांच्या अनियमितते बाबत.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम ३२ (१) (नमुना क्र. ११) व महाराष्ट्र महानगरपरिषद लेखा संहिता मधिल तरतुदीनुसार परिरक्षीत केले आहे. त्यानुसार मनपा कामगार कल्याण निधी, निवृत्ती वेतन निधी, महापौर निधी, इमारत घसारा निधी, यंत्र सामुग्री निधी, वेतन राखीव निधी, मनप रुग्णता निधी, मनपा कर्ज निवारण निधी, खासदार निधी, आमदार निधी, रुण्ता सहायता निधी,कर्ज निवारण निधी, भविष्य निर्वाह निधी, विकास निधी, वाहन घसारा निधी, आग निवारण (फायर निधी), राष्ट्रीय उपजिविका अभियान निधी, दलित वस्ती सुधारणा योजना निधी या निधींचे डेबुक लेखापरिक्षण कामी उपलब्ध करुन देण्यात आल्याने लेखापरिक्षण करण्यात आले आहे. मात्र विभागाने उर्वरीत निधींचे डेबुक हे लेखापरिक्षणकामी उपलब्ध करुन न दिल्याने लेखापरिक्षण करता आले नाही.

## परिच्छेद क्र. २१ :- शिक्षण विभागातील अभिलेखे उपलब्ध करुन न दिले बाबत.

उपरोक्त विषयांन्वये नाशिक महानगरपालिकेकडून मनपा शिक्षण विभागास आस्थापनापोटी ५०% व आस्थापना खर्चा व्यतिरिक्त इतर खर्चासाठी १००% रक्कम अनुदान स्वरूपात दिली जाते. या खर्चाचे लेखापरिक्षणकरीता खालील लेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत.

१) उपरोक्त नमूद वर्षात शिक्षण विभागात झालेल्या सर्व खर्चाच्या मूळ नस्ती व अनुषंगिक लेखे.
२) शिक्षण विभागाचे मंजुर अंदाजपत्रक
३) वजावट रजिष्टर, स्टॉक रजिष्टर मनपाकडून प्रत्येक वर्षात वर्ग झालेल्या रक्कमांचा तपशिल व शिक्षण विभागाकडे जमा खर्च झालेल्या रक्कमांचा तपशिल.
४) एकुण प्राथमिक शाळा संख्या, त्यांची यादी.
५) या वर्षात एकुण विद्यार्थी संख्या, त्यांची यादी
६) कॅशबुक, डेबुक, रोजकिर्द रजिष्टर (कॅशबुक) बँक ताळमेळपत्रक,रिकन्सीलेशनस्टेटमेंट.(विहीत नमुन्यात)
७) भविष्यनिर्वाह निधी बृहतपत्रक (Brod Sheet) लेजर,डे-बुक, बँकपासबुक.
८) मा. महालेखाकार (A.G. Audit) यांचा ऑडीटआक्षेप व पुर्तता करण्यातआलेल्या परिच्छेदांची प्रत.
९) मनपा मालकीच्या एकुण इमारतसंख्या, इमारतभाडे, तसेचशाळा, शाळांचे मैदाने खाजगी कार्यक्रम समारंभाकरीता देणेबाबतची भाडेपावती, ठराव, आदेश व संबंधितलेखे.
१०) अन्य अनुषंगिकअभिलेखे.

शासनपरिपत्रक क्र. लोलेस-२०१६/प्रक्र.०३/नवि-३१ दिनांक २२/०१/२०१६ अन्वये वार्षीक अहवाल सादर करणेकामी वेळेचे बंधन असल्याने तसेच लेखापरिक्षण कालमर्यादेत पुर्ण करावयाचे असल्याने उपरोक्त माहिती व प्रमाणित अभिलेखे सत्वर उपलब्ध करून देणेबाबत शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना निर्देशित करणे

कामी उपरोक्त संदर्भ पत्रान्वये व वारंवार मौखिक कळविण्यात आलेले होते. परंतु आजपावेतो सदरचे प्रमाणित अभिलेखे प्राप्त झालेले नसल्याने आक्षेप कायम करण्यात येतआहे. भविष्यात अनियमितता आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपले विभागाची राहिल.

वरील आक्षेपित बाबींची पुर्तता व खुलासा मुदतीत केलेला नसल्याने सदरचा आक्षेप कायम करणेत येत आहे.

**(ब. ज. गायकवाड)**
**मुख्यलेखापरिक्षक,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

महानगरपालिका सचिवालय

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## स्थायी समिती ठराव

**सभा क्र. :** ०५

**विषय क्र. :** ८८ **ठराव क्र. :** ८८ **दिनांक :** ०६/०९/२०२४

---

**संदर्भ- मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांचेकडील जा.क्र/ मुलेप/३२१/२४ दि.०६.०९.२०२४ चे पत्र.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मा.प्रशासक सो.यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यांत येत आहे कि,**

मुख्य लेखापरिक्षक नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५ अन्वये आर्थिक वर्ष सन २०२४ - २०२५ मधील दिनांक दि. १५/०७/२०२४ ते १६/०८/२०२४ या कालावधीतील साप्ताहिक अहवाल सादर करण्यात येत आहे. सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील कार्योत्तर लेखापरिक्षण अहवालाचे कामकाज चालू आहे. लेखापरिक्षणास प्राप्त झालेल्या नस्त्या,देयके यामधून र. रू **५१,३८,५९१/-** (अक्षरी रुपये एक्कावन्न लक्ष आडोतीस हजार पाचशे एक्याण्णव फक्त ) इतक्या रकमेची वसुली / बचत करणेत आली. त्यामुळे मनपाची बचत झाली आहे.

लेखापरिक्षण विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचे कामकाजाचा साप्ताहिक संक्षिप्त अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे. तसेच लेखा व वित्त विभागाचा सन २०२३-२४ चा वार्षिक लेखा अहवाल सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कालावधी | बचत /वसुली र.रुपये |
|---|---|---|
| १. | दि. १५/०७/२०२४ ते १९/०७/२०२४ | १५९११६० |
| २. | दि. २२/०७/२०२४ ते २६/०७/२०२४ | १५९७९३ |
| ३. | दि. २९/०७/२०२४ ते ०२/०८/२०२४ | ५४१३३ |
| ४. | दि. ०५/०८/२०२४ ते ०९/०८/२०२४ | ४६८६२५५ |
| ५. | दि. १२/०८/२०२४ ते १६/०८/२०२४ | ७९२५० |
| -- | **एकुण वसुली / बचत रक्कम रुपये ---** | **५१३८५९१** |

सबब मनपा अधिनियम १९४९ मधील कलम १०५ अन्वये साप्ताहिक दैनंदिनीचा अहवाल व महाराष्ट्र शासन नगरविकास परिपत्रक क्र.लोलेस २०१६/प्र.क्र.०३/नवि-३१, दिनांक २२/०१/२०१६ अन्वये लेखा व वित्त विभागाचा सन २०२३-२४ चा वार्षिक लेखा अहवालास नियमानुसार मंजुरी देण्यांत येत आहे.

**( मदन हरिश्चंद्र )**
**नगरसचिव,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**

**(डॉ.अशोक करंजकर)**
**प्रशासक,**
**नाशिक महनगरपालिका, नाशिक.**

लेखापरिक्षण विभाग
आवक पत्र क्र. ५२९
दिनांक १२/९/२४
श्री.
५८१०